**सोलापूर विद्यापीठ,सोलापूर**
**अभ्यास केंद्र**
**रंगभवन समोर,सोलापूर.**
**प्रवेश सूचना २०१७-१८**

सोलापूर विद्यापीठ :- सोलापूर शहरातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर वर्गात नियमित शिक्षण घेण-या सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, सोलापूर विद्यापीठाच्या (रंगभवन समोरील) इमारतीमध्ये असलेल्या अभ्यास केंद्रात सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील नियमित व बहीस्थ: विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया दि.१५ जुलै २०१७ पासून चालू करण्यात येणार आहे.

**अटी व सूचना :-**

१. सदरच्या अभ्यासिकेमध्ये सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेशित बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी/बी.ई विद्यार्थ्यांसाठी वार्षिक वाचन फी रू.३००/- आकारून प्रवेश दिला जातो. संबधीत विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्जावर संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची शिफारस घेवून (प्रतिज्ञापत्रासह) सादर करून आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करून घ्यावा.

२. सदरच्या अभ्यासकेंद्रामध्ये जे पदव्युत्तर, बहि:स्थ विद्यार्थी, एम.पी.एस.सी./सेट/नेट/आय.ए.एस. व इतर स्पर्धा परीक्षेची तयारी करू इच्छितात त्यांच्याकरीता वार्षिक वाचन शुल्क रू.५००/- भरून प्रवेशाची सोय करण्यात आलेली आहे. संबधीत विद्यार्थ्यांनी अर्जासोबत गुणपत्रिका, आयकार्ड साईज फोटो व पत्ताचा पुरावा आणणे आवश्यक आहे.

३. अभ्यासिकेची वेळ सकाळी ८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत अशी आहे.

४. अभ्यास केंद्रामध्ये वर्तमानपत्रे, एम्प्लायमेंन्ट न्युज, स्पर्धा परीक्षा पुस्तके, मसिके उपलब्ध आहेत.

५. अभ्यासकेंद्रामध्ये विद्यार्थ्यांना वाचन कक्षामध्ये बसून अभ्यास करण्याची सोय उपलब्ध आहे.

६. प्रवेशासंबधी इतर माहिती ही अभ्यासकेंद्राच्या कार्यालयामध्ये विचारून प्रवेश अर्ज भरावेत.

तरी सर्व विद्यार्थ्यांना या सूचनेव्दारे कळविण्यात येते की, प्रवेशासाठी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज रू. १०/- व नियमित शूल्क रू. ३००/- व ५००/- देवून अभ्यास केंद्राच्या कार्यालयातून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये (सकाळी १०.२० ते ६.०० पर्यंत) घेवून आपले प्रवेश निश्चीत करून घ्यावे.

19.6.17

प्र.कुलसचिव

दि. 19/06/२०17 20 JUN 2017

जाव क्रं.- सोविसो/अ.कें./27/4147

**प्रत** :- मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये सोलापूर शहर यांना विनंती की, सदरची बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

Scanned by CamScanner